प्रभाग समिती (ई) नालासोपारा (प.)
ता.वसई, जि.पालघर, पिन 401 203.

दूरध्वनी : 0250-2402179/2403224/2402101
फॅक्स : 0250-2402563
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com
जा.क्र. : व.वि.श.म./ साप्रवि / ७८३ / २२
दिनांक : २६/०५/२०२२

## द्वितीय फेर जाहिर दरपत्रक सुचना

याद्वारे सर्व संस्था व व्यक्ती यांचे माहितीसाठी कळविण्यांत येते की, वसई-विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती (ई) नालासोपारा कार्यक्षेत्रातील खालील तपशिलात नमुद केलेले तलाव दि. ०१/०६/२०२२ ते दि. ३१/०५/२०२४ (२ वर्षे) या कालावधीकरिता मत्स्यसंवर्धनाकरिता ठेका पद्धतीने द्यावयाचे आहेत. तरी इच्छुक व्यक्ती व संस्था यांचेकडून **दि. २६/०५/२०२२ रोजी सका. ११.०० वाजलेपासून ते दि. ०६/०६/२०२२ रोजी सायं. ४.०० वाजेपर्यंत** महानगरपालिकेच्या vvcmc.in या संकेतस्थळावर तसेच प्रभाग समिती (ई) नालासोपारा कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करणेंत येत आहे. इच्छुक दरपत्रकधारकाने सदर कामाचे दरपत्रक बंद लिफाफ्यामध्ये **दि. ०६/०६/२०२२ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत** प्रभाग समिती (ई) नालासोपारा कार्यालयाच्या सामान्य प्रशासन विभागात सादर करावेत.

| अ.क्र. | तलावाचे नाव | किमान देकार रक्कम | ठेकेदाराने भरावयाची रक्कम |
|---|---|---|---|
| १. | मराळे तलाव | ४४,७८४/- | |
| २. | कुक्कुटसार तलाव | १,१२,५०७/- | |
| ३. | सातारी तलाव | ४१,०७१/- | |
| ४. | जोसोडी तलाव | ५०,२५५/- | |
| ५. | उसारा तलाव | ५१,३४०/- | |
| ६. | कोरलमान तलाव | ६२,४६७/- | |
| ७. | कोरला तलाव | ३१,११३/- | |
| ८. | तळपा तलाव | २५,८५१/- | |
| ९. | खुटलई तलाव | ४१,५११/- | |
| १०. | डोंगरी मोडी तलाव | १,८७,८७५/- | |

**अटी-शर्ती**

१. इच्छुक व्यक्ती व संस्था यांनी स्वतःचे लेटरपॅडवर दरपत्रक सादर करावे.
२. मालकाचे/संस्थेचे पॅनकार्ड झेरॉक्स प्रत जोडण्यांत यावी.
३. दरपत्रक मुदतीमध्ये व वेळेमध्ये प्रभाग समिती (ई) नालासोपारा (प.) येथील सामान्य प्रशासन विभागात सादर करणे बंधनकारक राहील.
४. दरपत्रकास मंजुरीची समज दिल्यानंतर कार्यालयात उपस्थित राहून रु. १००/- चे करारपत्रावर करारनामा लिहून द्यावयाचा आहे. मुदतीत करारनामा न केल्यास दरपत्रक रद्द करण्यांत येईल.
५. जास्त देकार देणाऱ्या व्यक्ती अथवा संस्था हयांचे दरपत्रक मंजुर करणेंत येईल व मंजुर रक्कमेवर शासनाकडुन प्राप्त झालेल्या दरानुसार आयकर व GST वेगळा भरणा करावा लागेल.
६. मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके स्विकारणेचा अथवा नाकारणेचा अधिकार महापालिकेस राहील.
७. वरील अटींचे पालन जे व्यक्ती/संस्था करणार नाहीत त्यांचे दरपत्रक पडताळणी अंती अपात्र ठरविण्यांत येतील.
८. वरील तलावांची दरपत्रके बंद लिफाफ्यात दि. २६/०५/२०२२ ते दि. ०६/०६/२०२२ या दिवसापर्यंत दु. ३.०० वाजेपर्यंत प्रभाग समिती (ई) नालासोपारा (प.) येथे सादर करावित.
९. मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके दि. ०७/०६/२०२२ रोजी दु. ४.०० वाजता अथवा तद्नंतर सोयीनुसार मा. सहा.आयुक्त यांचे दालनात उपस्थित दरपत्रकधारक अथवा त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यांत येतील.

२६/५/२२

प्र. सहा.आयुक्त
प्रभाग समिती (ई) नालासोपारा
वसई-विरार शहर महानगरपालिका